पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक: २८/०३/२०२०

## "'कोवीड- १९' च्या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलीस दलाचा निराधारांना आधार"

'कोविड-१९' साथीच्या रोगाच्या पार्श्वभुमीवर संपुर्ण महाराष्ट्रात संचारबंदी लागु झालेली आहे. अत्यावश्यक सेवांसाठीच घराबाहेर पडण्याची मुभा नागरिकांना दिलेली आहे.

गडचिरोली पोलीस दलाचे जिगरबाज पोलीस अधिकारी हे देशविघातक कृत्य करणाऱ्या नक्षलवाद्यांविरोधात लढा देण्यासाठी सदैव तत्पर असतात. आता हेच पोलीस अधिकारी व कर्मचारी 'कोविड-१९' च्या तावडीतून आपल्या नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांच्या मार्गदर्शनाखाली दिवस-रात्र झटत असून अशा कठीण प्रसंगावेळी नागरिकांच्या पाठिशी गडचिरोली पोलीस दल खंबीरपणे उभे आहे.

देसाईगंज येथील गरीब मजदुर, हातावर पोट असलेल्या नागरिकांना या कठीण प्रसंगात मोफत घरपोच किराणा, भाजीपाला यांचे वाटप देसाईगंज पोलीसांकडून करण्यात येत असून, ८० नागरिकांच्या जेवणाची संपुर्ण जबाबदारी देखील घेण्यात आली आहे. आतापर्यंत एकुण २५० कुटूंबांना किराण्याचे वाटप करण्यात आले आहे. तर गडचिरोली पोलीस स्टेशनच्या हद्दीत जीवनावश्यक वस्तुंच्या खरेदीसाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना गडचिरोली पोस्टेतर्फे मोफत मास्कचे मोफत वाटप करण्यात आले आहे.

संचारबंदीच्या काळात नागरिकांसाठी देसाईगंजचे पोनि श्री. प्रदिप लांडे व गडचिरोली पोलीस स्टेशनचे पोनि श्री. प्रदिप चौगावकर यांनी सुरु केलेल्या उपक्रमांचे मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी कौतुक केले आहे.


Shot on OnePlus
By Maksood Patel